Vol 5 Issue 3 April 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-3 | April-2015 Available online at www.isrj.org

# ** doh ukjk;.k lqo ;kaph lun % vk'k; vkf.k lkn;l **

'kkarjke 'kykj



***पार्श्वभूमी :—***

' कवी नारायण सुर्वे ' यांचा पहिला कविता संग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म । सन 1962 मध्ये प्रकाशित झाला. मराठी कवितेच्या प्रांतात प्रस्तुत संग्रहाद्वारे त्याचा प्रथम परिचय झाला. पांढरपेशी संस्कृतीतील सदाशिवपेठी प्रवृत्तीच्या लेखक वर्गाला कवी सुर्वे याचा परिचय व प्रवेश विशेष वाटला. कारण प्राधान्याने पांढरपेशा वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या मराठी साहित्याच्या क्षेत्रात ................

''कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे
''

' चार शब्द '

अशी आत्मविश्वासपूर्वक ओळख ही समकालीन साहित्यात नवीन होती. त्यावेळी सुर्वे यांचे कवी म्हणून कौतुकाने स्वागत झाले. कवीच्या काव्यातील नवीन प्रवृत्तीने अनेकांचे लक्ष वेघून घेतले. 'कामगारांच्या जगात वाढलेला, त्यामधूनच स्फूर्ती घेतलेला आणि त्यांच्या व्यथा वेदना, अशा—आकांक्षा राग, लोभ, व्यक्त करणारा कवी' हीच सुर्वे यांची ओळख प्रभावी ठरली. बकाल वस्तीत अंधाराच्या सान्निध्यात निराधारपणे जीवन जगणारे पण प्रकाशाकडे झेपावण्याची जिद्द बाळगणारे, देवदैवतांची उपासना करणारे पण रोजच्या जीवनात संघर्षासाठी एक पाऊल मैदानात ठेवणारे, प्रस्थापिताचे जोखड झुगारून स्वतः मुसंडी मारून, नवे सांस्कृतिक परिवर्तन घडविणारे सीमारेषेवरचे जग, सुर्वे यांच्या कवितेत नव्याने प्रथमच अवतरू लागले.

सुर्वे यांनी मराठी कवितेत आजवर उपेक्षित राहिलेल्या कष्टकयांच्या वास्तव जीवनाचे दर्शन घडविले. त्यांचे दैन्य, दारिद्रय, उपासमार, हालअपेष्टा, निराधारपण, त्यांची सहनशीलता व जीवनसंघर्ष यांचा प्रत्यय कवितेत आणून दिला. दुःखाने पिचत असतानाच त्यांच्या अंतरंगात धुमसणाया प्रचंड शक्तीचा प्रत्यय आणून दिला. वरवर बकाल दिसणाया या जगातील माणसांच्या मनातील कोवळे भाव व्यक्त केले' श्रमिक व कष्टकरी जगाकडे पहाण्याची नवी दृष्टी दिली. सुर्वे यांचे आतापर्यंत पाच काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अ) ऐसा गा मी ब्रह्म ब) माझे विद्यापीठ क) जाहिरनामा ड) सनद

इ) नव्या माणसाचे आगमन इ. तसेच विपुल प्रमाणत त्याच्या कवितेवर समीक्षा लेखन झाले आहे.

## *'सनद': स्वरूप व सौंदर्य*

'सनद' हा नारायण सुर्वे यांच्या निवडक कवितांचा संग्रह होय. यामध्ये ऐसा गा मी ब्रह्म, माझे विद्यापीठ, जाहिरनामा, या तीन काव्यसंग्रहातील निवडक कविता समाविष्ट केलेल्या आहेत. त्यामध्ये एकूण 66 कविता असून इ.स. 1982 मध्ये संग्रह प्रकाशित झाला. आशय व अभ्यासाच्या दृष्टीने त्यातील कवितांचे स्थूलमानाने सोयीसाठी विभागणी करता येते. ती पुढील प्रमाणे

1)जीवनविषयक कविता
2)लोकगीत पध्दतीच्या रचना
3)कथनात्मक रचना
4)समूह मनाचा भाव चित्रण करणाया कविता
5)निवेदनपर कविता

'सनद' मधील 'चार शब्द' ऐसा गा मी ब्रह्म, शब्दांचे ईश्वर, 'माफ करा', 'अमुची दुनिया' 'दोन दिवस' 'माझे विद्यापीठ' 'स्वतःलाच रचीत गेलो', 'जाहीरनामा' एक नव्या संघर्षात इ. कविता म्हणजे कवीचा जीवन विषयक प्रतिक्रियांचा व प्रवृत्तीचा परिचय होय. कवीचे अनुभव संघटन कसे तयार होते, या विषयी चिंतन प्रांजळ व्यक्त होते.

कवी ब्रम्हांडास पाठीशी घालून दिवक्तालांच्या गाठी सोडवायला उत्सुक असतात. त्यांना तसा ठाम विश्वास वाटतो. कणखर आशावाद व निर्भीड वृत्तीमुळे कवीला पुढे जायला जोम आणि उल्हास वाटतो.

'' ऐसा गा मी ब्रह्म । विश्वासाचा आधार ।
खोलीस लाचार । हक्काचिया ।। ''

विश्वाचे गोकुळ करून सुर्याची लगोर रचायला कवी पुढे जायचे धाडस करतात. जगणे कशासाठी ? जन्म घेणे कुणासाठी ? असे प्रश्न घेऊन जगणारी माणसे जीवनात खूप भावविवश होतात. नाना संकटांना सामोरे जाताना, अनेक प्रकारचे हिशोब त्यांना मांडावे लागतात. हे सर्व का घडते ? तर जगण्याची ती एक पध्दत किंवा रीत असावी, गत जीवनातील अपूर्ण राहीलेल्या अपेक्षा भावी काळात पूर्ण होण्याचा त्यांचा मनोदय असतो निदान त्या भावस्थितीत जगणे, येवढे जरी समाधान लाभले, तरी ते त्यांना पुरेसे असते.

'दोन दिवस' या कवितेत अशा प्रकारचा हिशोब कवीने मांडला आहे.

'' दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे. किती राहिलेत डोईवर उन्होळे ''

वरील वर्णनातून कवीची जीवन विषयक आवस्था लक्षात येते सर्वांचा भविष्यकाळ, बदलणाया परिस्थितीतून निश्चित चांगला असेल, असे त्यातून सूचित होते.

' आजचे जगणे व उद्याचे लगणे ' यात अंतर आहे. तरीही उद्यासाठी जगणे महत्वाचे आहे, अशा आशावाद कष्टकरी माणसाला वाटतच असतो. असाहाय्य जीवन किंवा नको नको वाटणारे कष्ट, सहनशिलता दाखवून सोसावेच लागतात. ही कवीची प्रवृत्ती आहे. उद्याचा संभाव्य संघर्ष अटळ आहे. म्हणून आज हातातील सारीच शास्त्रे खाली टाकून कसे चालेल ? यासाठी आपल्या सवंगडयांना कवी सल्ला देतात की,

'माफ करा, एवढे काम मला सांगूच नका ।'

यातून कवीने प्रातिनिधीक स्वरूपात इतरांना उपदेश करून पलायनवादी वृत्तीला सतर्कतेचा इशारा दिला आहे.

लोकगीत पध्दतीच्या काही कविता सहज आकलन होण्यासारख्या आहेत. त्यामध्ये 'डोंगरी शेत', 'गाडी आणा

बुरख्याची' 'गिरणीची लावणी' या कवितांचा समावेश होतो या कवितांना गेय, गीत पध्दतीच्या रचना म्हणता येती. 'डोंगरी शेत' हे सुर्वे यांचे गाजलेले गीत आहे. त्यात लोकगीताची धाटणी आहे. गीतांची रचना प्रामुख्याने म्हणण्यासाठी, तालासुरात गाण्यासाठी असते. गायनाच्या मंत्रानुसार खटकेबाज शब्दरचना, ग्रामीण ढंग व कल्पकता या अशा रचना सुमधुर व श्रवणीय होतात.

लोककलेशी सुर्वे यांचे प्रथमपासून अतूट असे नाते निर्माण झालेले आहे, समाजाच्या वेगवेगळया स्तरामध्ये सुर्वे यांचा चळवळीच्या व कामगारांच्या सभा मेळाव्यातून संबंध निर्माण झाला होता. त्यामुळे लोकांच्या भावभावना ते आपल्या गीतातून प्रगट करू लागले.

कष्टकरी वर्गाला श्रम करताना, ते श्रम हलके वाटावेत श्रमातून सुख मिळावे, यासाठीचे काही गीताची निर्मिती झाली आहे, कामगार वर्गाने संघर्षासाठी एकजुटीने राहावे अशा स्वरूपाचा मनोभाव कवीने जपला. गीतातून प्रगट केला आहे.

'' डोंगरी शेत माझं गं मी बेनू किती
आलं वरीस राबू मी मरावं किती ''

अशा अनुभवातून जीवघेण्या दु:खाचा हुंकार स्त्रीमुखातून प्रगट करीत आहे, तसाच संघटित होण्याचा मंत्रही त्यांनी दिला आहे.

'' रूप नवं आणू माया धरतीला
तोडू जुलूमाचे काच हे रावणी फास
एकीच निशाण हाती ''

मार्क्सवादी तत्वज्ञानाने भारलेले विचार वरील गीतातून स्पष्ट होतात. कामगारांच्या जीवनातील संघर्षासाठी वर्ग लढा हा मार्क्सवादी विचारांचा प्रमुख धागा मानला जातो. त्यानुसार कामगारांच्या चळवळीला, मोर्चे, आंदोलने, संप, बहिष्कार, उपोषण इ. प्रसंगी अशा गीतांचा उपयोग होतो.

लोकगीतातील काल्पनिकता, व मनोहारी भाव व्यक्त करणारी, 'गाडी आणा बुरख्याची' ही कविताही महत्वपूर्ण आहे . (पहा. पृ. 10) कवीची लोक जीवनातील ओढ त्यातून प्रगट होते.

कामगार संघटनांशी सुर्वे यांचा घनिष्ट संबंध आलेला होता. कष्टकरी व कामगार वर्गाशी ते समरस झालेले होते. कामगारांच्या श्रमातून सुतगिरणींची धुराडी पेटत होती. कामगारांच्या हजारो हातांनी कापड निर्मिती होत होती. कामगार आणि सुतगिरणी यांचा सहसंबंध जिव्हाळा सुर्वे यांनी कवितेतून वर्णन केला आहे. ( पहा – गिरणीची लावणी 102 )

प्रस्तुतच्या लावणीत पारंपारिक शाहिरी वाड्.मयातील शृंगारिक अर्थ किंवा अश्लिल भाव नाहीत. तर जे वास्तव आहे, त्या वास्तवाला अनुसरून कष्टकरी जीवनाची व्यथा व वस्तुस्थिती कवीने वर्णन केलेली आहे.

सुर्वे यांची कविता वाचक, रसिक श्रोते, यांच्याशी सहज संवाद साधू शकते, कारण सुर्वे यांच्या कवितेचा मूळ स्वभाव हा कामगाराचे जीवनदर्शन हाच आहे. त्यामुळे गोष्टरूपाने किंवा कथनरूपाने अनुभव कथन करायची विशिष्ट लकब सुर्वे यांनी स्विकारली असावी. प्रस्तुत संग्रहातील 'माझी आई' ही अशा प्रकारची कविता आहे या कवितेतील कथानात्मकतेला भूतकाळ आहे. घडून गेलेल्या घटनेचा कारूण्यमयी भाव त्यात प्रगट झाला आहे. 'आईचे वात्सल्यरूपी भाव व आईच्या मृत्यूतील कारूण्य' हे परस्पर विसंवादी भाव त्यातून निदर्शनास येतात. शेवटी कवीचे पोरकेपण, निराधार व बकालपण त्यातून स्पष्ट होते, एका पाच भावंडे आईच्या आकस्मिक मृत्यूमुळे निराधार होतात. त्यानंतर ते कसे जगतात, आईचे कृपाछत्र हरपल्याने त्यांची काय अवस्था होते. भेदरलेल्या अवस्थेत एकमेकांना बिलगून ते जगण्याचा एकोपा दाखवतात इ. प्रसंग वाचकाच्या मनाला चटका लावतात.

'' त्याच रात्री आम्ही पाचांनी
एकमेकास बिलगूनी
आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून ''

आधीच पदरी दारिद्रय असलेल्या या मुलांना, आता आई देखील नाही. अश्रूंना अवर घालून पुढे कलंदर अवस्थेत

जीवन जगावे लागते. हे फार मोठे संकटच म्हणाचे लागेल.

प्रस्तुत संग्रहात 'नेहरू गेलेल्या वेळची गोष्ट', 'बरं कारे पोरा', शीगवला, कार्लमार्क्स इ. कविताही गोष्टरूपाने साकार झालेल्या आहेत. यामध्ये समूह चित्रण करणाया सुर्वे यांच्या कविता लक्षणीय आहेत. उदा. 'पाणी घे', 'पोस्टर', 'माझे विद्यापीठ' 'मुंबई' 'जाहीरनामा' माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय इ. कविताचा समावेश होतो.

सुर्वे यांच्या 'समूहाचे वर्णन' करणाया कविता वाचल्या तर बाहयवैशिष्टयामुळेच त्या वेगळया वाटतात. बाहय वास्तवातील स्वानुभव त्यातून व्यक्त झाल्याने त्या रचनेत प्रभावीपण जाणवते. कवितेला भाव सूचक असून कवीने आपल्या अनुभवांचा घाट अनुरूप करून समूहवर्णनाची पध्दत स्वीकारलेली दिसते.

सनद मधील भाषा ही व्यावहारिक 'बोली' स्वरूपाची आहे. भाषेचा 'घाट' लोक व्यावहारातील आहे. लोकांच्या चालीरितीतून त्या भाषेतून सहज प्रगट होतात. 'हिंदी – मराठी' अशी संमिश्र स्वरूपाची भाषाही काही ठिकाणी योजलेली दिसते. (उदा – पोस्टर )

'सनद' या काव्य संग्रहातील कवितांना कामगार व कष्टकरी वर्गाच्या घामाचा वास आहे. त्यातून कवीचा आत्मनिष्ठ स्वर एकरूपाने व जिव्हाळारूपाने त्यात मिसळतो. काव्य रचनेत सहकंप, संवेदना, गहिवरलेले भाव आपोआप येतात. कामगार जगाची त्यात 'गंधवेणा' असते. कविता वाचताना वाचक वर्ग 'मंत्रमुगध' होतो. कवितून सर्वसामान्य वर्ग वास्तवाशी समरस होऊ शकतो.

## *संदर्भ ग्रंथ :–*

1) 'सनद' – ग्रंथाली प्रकाशन, मुंबई 1982
2) नारायण सुर्वे यांची कविता : दिगंबर पाध्ये लोकवाड्.मय गृह 1982
3) सुर्वे यांचे विद्यापीठ संपा.पुष्पा राजापुरे संदर्भ प्रकाशन, ठाणे 1993
4) मार्क्सवाद आणि मराठी साहित्स : वि.स.जोग विजय प्रकाशन, नागपूर 1981
5) प्रतिष्ठान, नारायण सुर्वे, विशेषांक, परभणी 68, अ.भा.म.साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मराठवाडा साहित्य, परिषद, नोहें–डिसें.1994
6) पूर्वा मासिक, खास अंक, ऑगस्ट 1982

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org